MHKO050000902019

**नियमित दरखास्त क्रं.५/२०१९,**

**निशाणी क्रं.२३ वरील आदेश**

**रमजान अब्दुल सनदी / दस्तगीर बाबासो सनदी**

दरखास्तदाराने प्रस्तुत अर्ज वि.प. हे कुंपण बांधणेकरिता करत असलेल्या हरकत, अडथळाच्या कृत्याचा बंदोबस्त करणेसाठी दरखास्तदारास पोलीस संरक्षण मिळण्यासाठी आदेश व्हावा म्हणून दाखल केला आहे.

२. दरखास्तदाराचे कथन असे की, वि.प. याचेविरुध्द रे.क.नं.८३/२०१४ चे कामी वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जा वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये असा मनाई आदेश केला आहे, दरखास्तदार हे दावा मिळकतीला कुंपण बांधत असताना वि.प. यांनी हरकत, अडथळा केल्यामुळे दरखास्तदारा यांना दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेणे अशक्य झाले आहे, करिता दरखास्तदार यांना पोलीस संरक्षण मिळालेस त्यांना मिळकतीचा उपभोग घेता येणार आहे, तसे पोलीस संरक्षण मिळालेस वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, दरखास्तदार हे पोलीस भत्ता भरणेस तयार असून प्रस्तुत अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. याउलट वि.प. यांनी **नि.२४** कडे म्हणणे दाखल केले असून अर्ज साधनी व अभिलाष बुध्दीचा असल्याचे कथन करुन त्यातील सर्व कथनांचा इन्कार केला आहे. वि.प.चे कथन असे की, रे.क.नं.८३/२०१४ चे कामी त्यांना गैरहजर दाखवून दरखास्तदार यांनी एकतर्फे आदेश घेतले आहेत व ते निर्णय गुणदोषावर झालेले नाहीत, त्यांनी रे.क.नं.८३/२०१४ चे काम पुन्हा फैलावर घेवून गुणदोषावर चालणेकरिता किरकोळ दिवाणी

अर्ज क्रं.२२/२०२२ दाखल केलेला आहे, सदर प्रकरण न्यायप्रलंबित असून त्याकामी दरखास्तदार हजर झाले आहेत, तसेच प्रस्तुत अर्जातील कलम २ मध्ये अर्जास कारण घडलेबाबत नेमकी तारीख, वार, वेळ नमूद नाही, वि.प. यांना निव्वळ त्रास देणेसाठी खोट्या मजकुराचा अर्ज केला आहे, प्रस्तुत अर्जामध्ये कथीत दावा मिळकतीचा चालू ग्रामपंचायत घर मिळकत नंबर दिलेला नाही, दरखास्तदार हे मोघम विधाने करुन कोर्टाचा आदेश घेवू पाहत आहेत, अर्जदार यांना कथीत दावा मिळकतीचा सिटी सर्व्हे नंबर/गट नंबर/ग्रामपंचायत अनुक्रम नंबर/ग्रामपंचायत मिळकत नंबर, मिळकतीच क्षेत्र, मिळकतीचा नकाशा, कथीत कंपाऊंड करणेबाबत सक्षम अधिकारी यांचा परवाना इत्यादी कागदपत्रे हजर करणे आवश्यक परंतु तसे झाले नाही. दरखास्तदार हे मोघम विधाने करुन न्यायालयाकडून आदेश घेवून ईच्छित आहेत. दरखास्तदार त्यांच्या इच्छेप्रमाणे कंपाऊंड घालू पाहत आहेत. तसे त्यांना करता येणार नाही. त्याबाबत सक्षम अधिका–याचा परवाना घेतलेला नाही. त्यामुळे पोलीस संरक्षणासारखी दाद मागता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत अर्जाव्दारे वादी यांनी रे.क.नं.८३/२०१४ मध्ये न्यायालयाचा झालेला आदेश पाहता त्याप्रमाणे त्या दाव्यातील दावा मिळकतीस कुंपण घालून दावा मिळकतीचे बांधकाम करणेकरिता वि.प. हरकत करत असले म्हणून दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेणेसाठी पोलीस संरक्षणाची मागणी केली आहे. वि.प. यांचा पोलीस संरक्षणासाठी तीव्र विरोध दिसतो. दरखास्तदार यांचे कथन आहे की, ते नमूद दाव्यातील दावा मिळकतीत बांधकाम करु इच्छित आहेत व त्यासाठी वि.प. हे अडथळा करत आहेत. दरखास्तदार यांनी त्यांचे बांधकाम

चालू असलेबाबत किंवा करत असलेबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच, त्यांनी कशा प्रकारे हरकत, अडथळा वि.प.ने केला याचे स्पष्टीकरण केलेले नाही. वादीला त्या दाव्याव्दारे झालेल्या आदेशातून त्याच्या वैयक्तीक दिवाणी हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून न्यायालयाने न्यायनिर्णय त्याच्या हक्कात दिला आहे. त्याच्या संरक्षणासाठी वादीने पोलीस संरक्षणाची मागणी या अर्जाव्दारे वरील कारणासाठी वि.प. विरुध्द केली आहे. कायद्याने दिवाणी हक्काचे उल्लंघन झाल्यास दिवाणी प्रकारची मागणी कायद्यात नमूद आहे. त्याकरिता पोलीस संरक्षण घेवून दिवाणी हक्काची अंमलबजावणी कायद्याने प्रत्येक बाबीसाठी मान्य केलेली नाही.

६. प्रथमतः न्यायालयाला दिवाणी हक्काबाबत कोणत्या परिस्थितीत पोलीस संरक्षण देता येईल याबाबत मा.केरळ उच्च न्यायालयाने दिलेले मार्गदर्शन पाहणे आवश्यक आहे. मा.न्यायालयाने ***Georce Mirante Vs. State of Kerala***[1], या न्यायनिर्णयात परिच्छेद पाच मध्ये असे मत नोंदविले आहे की,

> *"In matters involving civil rights, or disputes regarding title and possession over property, it is not proper for this Court to interfere under* Article 226 *of the Constitution with an order for police protection. Police cannot be made the adjudicators such disputes inter se between the parties, either regarding possession of property or regarding boundaries or regarding easements or the like. These are matters essentially within the domain of the Civil Courts on which the parties should approach those Courts and seek redress. Police does not have the right to decide on such disputes, nor is it proper or competent for them to do so. They do not also have the machinery for the purpose. It is outside the limits of the duties which are cast on them, which is to prevent breach of peace or commission of cognisable offences, and to preserve law and order. It will be totally against the rule of law if the right of the police is to be used in favour of one party against another without an adjudication by any appropriate authority of the rights of either side. In all such cases, the proper remedy, for a party feeling aggrieved, is to approach the Civil Court for the establishment of his rights, and seek appropriate injunctive reliefs*

1 1990 (2) KLT 89

*against the offending party, and if any such orders are attempted to be violated to seek their enforcement by the Civil Court itself.*"

**७.** सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता मा.न्यायालयाने दिवाणी प्रकारच्या हक्काच्या संरक्षणासाठी दिवाणी स्वरुपाची मागणी करणे आवश्यक असून त्याकरिता पोलीस संरक्षण देणे कायद्याला अभिप्रेत नाही असे मत नोंदविल्याचे दिसते. तसेच, मा.मुंबई उच्च न्यायालयाने वेगवेगळ्या न्याय निवाड्यात असे मत नोंदविले आहे की, दिवाणी दाव्यातील आदेशाबाबत आदेश दिला असताना पोलीस संरक्षण ही अत्यंत शेवटची प्रक्रिया म्हणून विचार करण्यात यावी. प्रस्तुत अर्जाव्दारे दरखास्तदाराने वेगवेगळ्या प्रकारची वि.प.विरुध्द कथने करुन त्याबाबत पोलीस संरक्षण मागितले आहे. प्रथमतः त्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. तसेच, दरखास्तदार यांनी त्यांना वि.प. यांनी कधीही, कसा व काय म्हणून अडथळा केला याचे स्पष्टीकरण प्रस्तुत अर्जात दिलेले नाही. तसेच, दरखास्तदाराने मागणी केल्याप्रमाणे पोलीस संरक्षणाची मागणी कोणत्याही प्रकारे पुराव्याशिवाय देणे चुकीचे होईल. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन झाल्यास योग्य कायदेशीर अधिकार वादीकडे देण्यात आलेले आहेत. त्यामुळे तसे कायदेशीर पर्याय वादीला उपलब्ध असतानाही अशा प्रकारची मागणी करणे व ती न्यायालयाने देणे हे कायद्याला व मा.उच्च न्यायालयाला वर नमूद केलेल्या न्याय निवाड्यातून अपेक्षीत नाही. त्यामुळे दरखास्तदार यांनी केलेली मागणी ग्राह्य धरणे कायदेशीर नाही. सबब, खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

वादी यांचा प्रस्तुत अर्ज (**नि.२३**) नामंजूर करण्यात येतो.

दि.०३/०७/२०२३ (डा. डा.जी.पटवे)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.

Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2023.07.03 17:35:34 +0530